आदित्य बिर्ला सन लाईफ म्युच्युअल फंडाचा नवा

बिझनेस सायकल फंड जाहीर

ADITYA BIRLA CAPITAL
Aditya Birla Sun Life Mutual Fund

- व्यवसायातील विविध टप्प्यांनुसार गुंतवणुकीचे पर्याय उपलब्ध
- नवीन फंडाची किंमत १० रुपयांपासून
- कमीत कमी गुंतवणूक मूल्य ५००० पासून सुरुवात

नांदेड (प्रतिनिधी) – देशातील नामांकित संस्था असलेल्या आदित्य बिर्ला सन लाईफ म्युच्युअल फंडाने आपला नवा बिझनेस सायकल फंड जाहीर केला असून, या फंडानुसार एक व्यवसाय-सायकल-आधारित गुंतवणूक थीम असलेली एक ओपन-एंडेड इक्विटी योजना असून आदित्य बिर्ला सन लाईफ एएमसी लिमिटेडद्वारे लॉन्च करण्यात आली आहे. त्याचा कालावधी दि. १५ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबरदरम्यान ही ऑफर उपलब्ध असून या फंडासाठी एक नवीन फंड ऑफर (NFO) उपलब्ध आहे.

आदित्य बिर्ला सन लाईफ म्युच्युअल फंडाच्या वतीने सांगितले आहे की, फंड अनेक पॅरामीटर्सवर आधारित आहे. यात व्यवसायाच्या वेगवेगळ्या टप्प्यानुसार हा पोर्टफोलिओ बांधण्यात आला असून यात टॉप-डाऊन दृष्टीकोन वापरलेला आहे. कारण गुंतवणूकदारांना आर्थिक आणि क्षेत्रीय चक्र आणि त्यानुसार संक्रमणाचे टप्पे ओळखता येत नसल्यामुळे, आदित्य बिर्ला सन लाईफ बिझनेस सायकल फंडसारख्या योजनेचा वापर व्यवसाय चक्राच्या बदलत्या टप्प्यांशी जुळणाऱ्या गुंतवणुकीच्या शक्यतांचा लाभ घेण्यासाठी केला जाऊ शकतो.

आदित्य बिर्ला सन लाईफ बिझनेस सायकल फंड ही योजना अंदाजानुसार आगामी चक्रीय संधी ओळखण्याचा प्रयत्न करते, ज्यात प्रामुख्याने अर्थव्यवस्थेच्या चक्रीय टप्प्यातील बदल तसेच विशिष्ट आर्थिक टप्प्यावर आधारित अनुकूल क्षेत्रे आणि संधी त्यासोबतच शेवटी या ओळखल्या गेलेल्या संधींमध्ये उद्योग प्रमुखांचा पोर्टफोलिओ तयार करण्यासाठी तुम्ही यामध्ये गुंतवणूक का करावीत? निधी कसा वापरावा? यावर निष्कर्ष नोंदवून प्रत्यक्षात काम करायल पाहिजे असे सर्वसाधारण व सोपे स्वरूप या नवीन फंडाचे आहे.

फंड हाऊसच्या मते, भिन्न चक्रीय कालावधी वेगवेगळ्या क्षेत्रांना अनुकूल असतात: आकुंचन टप्प्यात, संरक्षणात्मक क्षेत्रे जसे की ग्राहक गुंतवणूकीचे वेगवेगळे टप्पे आणि आरोग्यसेवा, जे आवश्यक आहेत, त्यापेक्षा जास्त कामगिरी करतात; विस्ताराच्या टप्प्यात, विवेकाधीन मागणीसह गैर-संरक्षणात्मक क्षेत्रांमध्ये संधी उघडतात. या फंडामध्ये सर्व व्यवसाय चक्रांमध्ये विस्तार करण्याची क्षमता आहे कारण तो या संधी आधीच ओळखण्यावर लक्ष केंद्रीत करतो.

या फंडामध्ये निवडक आणि अनुकूल जगभरातील संधींमध्ये गुंतवणूक करण्याची क्षमता देखील आहे, ज्यामुळे तुम्हाला जागतिक बाजारपेठा समोर येऊ शकतात. यात दीर्घकालीन भांडवली वाढीची क्षमता आहे कारण हा एक इक्विटी फंड आहे. न्यू फंड ऑफर स्विच गुंतवणूकदार न्यू फंड ऑफर स्मार्ट स्विच वापरून आदित्य बिर्ला सन लाईफ लिक्विड फंडमध्ये न्यू फंड ऑफरसाठी पैसे जमा करू शकतात. NFO दि. १५ नोव्हेंबर रोजी उघडेल. या फंडाचे न्यू फंड ऑफर स्मार्ट स्विच दि. २५ ऑक्टोबर रोजी उघडले आहे.

तरी अशा अनेक व विविधांगी सुविधा असलेल्या या आदित्य बिर्ला सन लाईफ म्युच्युअल फंडाचा नवा बिझनेस सायकल फंडाचा गुंतवणूकदारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन नांदेड येथील गुंतवणूक मार्गदर्शक तथा श्री साई ईनव्हेस्टमेंटस्चे संचालक विवेक कळसकर यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क :
श्री. विवेक कळसकर
संचालक, साई इन्व्हेस्टमेंट सर्व्हिसेस,
संतकृपा मार्केट व श्रीनगर, नांदेड
संपर्क : ९४२२८७०९७७

वडिलांच्या मृत्यूच्या धक्क्याने विवाहित मुलीचाही मृत्यू

नांदेड (प्रतिनिधी) – सासरच्या मंडळींकडून मुलीला होत असलेल्या त्रासामुळे कंटाळलेल्या मुलीच्या वडीलाने आत्महत्या केली. वडिलांच्या मृत्यूचा जबर धक्का बसल्यामुळे विवाहित मुलीचाही मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना सुगाव ता. देगलूर येथे घडली.

शंकर परशुराम भोसले रा. सुगाव ता. देगलूर यांची मोठी मुलगी माधुरी हिचा विवाह दि. १२ जुलै २०२० रोजी उंद्री (पदे) येथील नणंदेचा मुलगा संदीप वडजे (२५) यांच्यासोबत झाला. लग्नानंतर पंधरा दिवसांपासूनच सासू रावणबाई वडजे, सासरा हनुमंत वडजे, नणंद शीला, दुसरी नणंद कु. प्रणिता हे सर्वजण माधुरीला 'तुला काम येत नाही, स्वयंपाक करता येत नाही, आम्ही दुसरी मुलगी करणार होतो, तू आम्हाला पसंद नाहीस' म्हणून त्रास देऊ लागले. पती संदीपने सासरी कळविले की, माधुरी नीट वागत नाही त्यामुळे आम्ही तिला नांदवू शकत नाही, असे म्हणून त्याने माधुरीला सुगावला आणून सोडले. जवळच्या नातेवाईकांनी जानेवारी २०२१ मध्ये माधुरीला तिच्या सासरी नेऊन सोडले. त्यानंतर जावई पुण्याला जातांना माधुरीला सोबत घेऊन गेला; परंतु तेथेही सासू, दोन्ही नणंद सोबत गेल्या. तेथेही त्यांनी माधुरीला चारचाकी गाडी खरेदी करण्यासाठी तसेच पुण्यात प्लॉट घेण्यासाठी माहेराहून ५ लाख रूपये घेऊन येण्याकरिता तगादा लावला. माधुरीला सतत त्रास देऊ लागले. मार्च २०२१ मध्ये संदीपने सासरा शंकर भोसले यांना फोन करून सांगितले की, मी माधुरीला नांदवून घेऊ शकत नाही. तुम्ही ताबडतोब तिला घेऊन जा. त्यावेळी माधुरीचे वडील शंकर भोसले आणि मामा प्रवीण तरटे हे माधुरीला पुण्यावरून सुगावला घेऊन आले. तेव्हापासून माधुरी सुगावालाच राहत होती. मुलीच्या सासरच्या मंडळींकडून मुलीला सतत होणारा त्रास व पैशांची मागणी यामुळे कंटाळून शंकर भोसले याने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. पित्याच्या मृत्यूचा विवाहित मुलगी माधुरीला मानसिक धक्का बसला. त्यामुळे तिचाही मृत्यू झाला. एकाच दिवशी वडील आणि विवाहित मुलीचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

दीड महिन्यापासुन घरकुलाचे पैसे खात्यावर पडेनात

शंभरच्यावर लाभार्थी हैराण

नायगाव (वार्ताहर) – देशात एकही गरीब कुटुंब घरापासुन वंचित राहू नये, यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान झाल्यापासून प्रधानमंत्री आवास घरकुल योजना सुरू केली. मागील दीड महिन्यापासून घरकुलधारक घर बांधूनही खात्यावर रक्कम जमा होत नसल्याने घरकुलधारक हतबल झाले आहेत.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात प्रधानमंत्री घरकुल योजना सुरू केली. मागील काळात नायगाव तालुक्यात जवळपास ५२४८ घरकुल मंजूर केले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरिबांसाठी सुरू केलेल्या या महत्त्वाकांक्षी योजनेचा देशासह नायगाव तालुक्यातील बऱ्याच कुटुंबाला फायदा होऊन अनेकांचे घर बांधण्याचे स्वप्न पूर्ण झाले. मंजूर झालेल्या ५२४८ घरकुलधारकांपैकी ३४४५ लाभधारकांनी घर बांधकाम पूर्ण केले असून उर्वरीत राहिलेल्या १८०३ लाभार्थ्यांच्या खात्यावर पहिला हप्त्याची रक्कम जमा झाल्याने हे लाभार्थ्यांना पुढील काळात घरकुल बांधकाम पुर्ण होणार आहे.

मागील काळातील लाभार्थ्यांचे घरकुल बांधकाम पूर्ण झाले. त्यातील शंभर लाभार्थ्यांच्यावर लाभार्थ्यांचे तिसरे व शौचालय बांधकाम पूर्ण झालेल्या असे चौथे बिल पंचायत समितीकडून ऑनलाईनही करण्यात आले; पण गेल्या दीड महिन्यापासून एफ.टी.ओ.ची अडचण येत असल्याने रक्कम जमा होत नसल्याचे घरकुल विभागाचे कर्मचारी पांचाळ यांनी सांगितले. घरकुल बांधूनही रक्कम खात्यावर जमा होत नसल्याने अनेक लाभार्थ्यां अडचणीत सापडले आहेत. हे लाभार्थी पंचायत समितीला खेटे मारत आहेत. तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन घरकुलांची रखडलेली रक्कम मिळून द्यावी, अशी मागणी घरकुलधारकांतून होत आहे.

विशेष म्हणजे पंतप्रधान आवास घरकुल योजनेमुळे अनेक कुटुंबांना पक्के घर बांधण्याचे स्वप्न पूर्ण झाले आहे.

अ.भा. छावा संघटनेच्या उत्तर जिल्हाध्यक्षपदी दशरथ कपाटे

नांदेड (प्रतिनिधी) – अखिल भारतीय छावा संघटनेच्या उत्तर जिल्हाध्यक्षपदी दशरथ कपाटे यांची फेरनिवड तर माधवराव ताटे यांची अखिल भारतीय छावा संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष नानासाहेब जावळे पाटील यांनी फेरनिवड केली. यावेळी शेतकरी नेते विजयकुमार घाडगे पाटील, छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष पंजाबराव काळे पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष बालाजी दादा सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. मराठ्यांचे क्रांतीसूर्य, अखिल भारतीय छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अण्णासाहेब जावळे पाटील यांच्या प्रेरणेने ही संघटना सबंध महाराष्ट्रभर नावारुपास आलेली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून नांदेड जिल्ह्यामध्ये संघटना वाढीचे काम जोमाने करणारे दशरथ पाटील कपाटे व माधवराव ताटे यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांची लातूर येथे झालेल्या व्यापक बैठकीमध्ये फेरनिवड करण्यात आलेली आहे.

नि:स्वार्थी आणि चारित्र्यवान सहकाऱ्याला गमावले - खतगावकर

नांदेड (प्रतिनिधी) – जिल्ह्याच्या राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, साहित्यीक व धार्मिक क्षेत्रात भरीव कामगिरी केलेले ज्येष्ठ साहित्यिक कै. भगवानराव भिलवंडे यांचे आज निधन झाले. त्यांच्या निधनामुळे नांदेड जिल्ह्याच्या राजकारणात फार मोठी पोकळी निर्माण झाल्याचे माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी शोकसंदेशात म्हटले आहे.

भिलवंडे व खतगावकर परिवाराचे गेल्या पन्नास वर्षांपासूनचे कौटुंबिक व जिव्हाळ्याचे संबंध आहेत. कै. भगवानराव भिलवंडे यांचा नुकताच गेल्या आठवड्यातच नरसी येथे गौरव सोहळा व 'आनंदीसुत' पुस्तकाचे प्रकाशन माझ्या व पालकमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत झाला त्यावेळेसच माझी आणि कै. भगवानरावची शेवटची भेट झाली.

कै. भगवानराव भिलवंडे यांचा जन्म नरसीसारख्या ग्रामीण भागात सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. कै. भगवानराव भिलवंडे यांचा स्वभाव शांत, संयमी, हसतमुख चेहरा व दिलदार व्यक्तिमत्त्व होते. कै. भगवानराव भिलवंडे यांच्या

घरी कोणीही व कोणत्याही वेळी गेला तरी त्यांच्या घरून उपाशी जात नसत, त्यांच्या घरची चूल नेहमीच सुरू राहत असे. त्यांच्या आई अतिशय धार्मिक वृत्तीच्या असल्यामुळे सर्व परिसरातील नागरिकांना त्या माया लावत असत. त्यांना वाचनाची व साहित्य लिखाणाची आवड होती व शेरो-शायरी करीत असत. त्यांचे वक्तृत्व अतिशय चांगले होते.

कै. भगवानराव भिलवंडे यांनी गोदावरी मनार सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष, गोदावरी मनार चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव, संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष, बिलोली काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, पंचायत समिती सदस्य, महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतील मंडळावर सदस्य म्हणून काम अतिशय चांगल्या पद्धतीने काम केले आहे. कै. भगवानराव भिलवंडे हे स्व. शंकरराव चव्हाण साहेबांचे विश्वासू होते व चव्हाण साहेबांच्या नेतृत्वात त्यांनी काम केले. त्यांनी आजपर्यंत विविध पदे भूषविली. स्व. शंकरराव चव्हाण साहेबांच्या व माझ्या निवडणुकीत नरसी येथून त्यांच्या घरूनच सर्व प्रचार यंत्रणा चालत होती. कै. मधुकरराव पाटील खतगावकर व कै. भगवानराव भिलवंडे यांचे अतिशय जिव्हाळ्याचे संबंध होते.

कै. भगवानराव भिलवंडे यांचे कार्य नांदेड जिल्ह्यातील जनता कधीही विसरणार नसल्याचेही खतगावकर यांनी शोकसंदेशात म्हटले आहे. प्रकाश, भास्कर व राजू भिलवंडे यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला असून त्यांना दु:ख सहन करण्याची शक्ती देवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना व कै. भगवानराव भिलवंडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

उपविभागीय अधिकारी राजेंद्र खंदारे यांनी घेतली बैठक

धर्माबाद (वार्ताहर) – येथील उपविभागीय अधिकारी राजेंद्र शेळके हे दीर्घ वैद्यकीय रजेवर गेल्यामुळे त्यांच्या जागी भोकर येथील उपविभागीय अधिकारी राजेंद्र खंदारे यांना पदभार देण्यात आला आहे. त्यामुळे उपविभागीय अधिकारी राजेंद्र खंदारे यांनी शुक्रवारी पदभार घेतला आहे. लगेच नायब तहसीलदार, तलाठी, मंडळ अधिकारी, तहसील व उपविभागीय अधिकारी कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांची बैठक घेतली आहे.

सदरील बैठकीत सर्व उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांची ओळख करून घेतली व प्रलंबित सर्व प्रकरणे अगोदर निकाली काढावे. तसेच कामात पारदर्शकता असले पाहिजे, अन्यथा नियमानुसार संबंधितांवर कठोर कारवाई करणार असल्याचे उपविभागीय अधिकारी राजेंद्र खंदारे यांनी ठणकावून सांगितल्यामुळे बैठकीनंतर तहसिल कार्यालयात ही चर्चा चांगलीच रंगली होती. यापुढे कामात पारदर्शकता ठेवावीच लागणार आहे अन्यथा आपली काही खैर नाही, अशीही चर्चा कर्मचाऱ्यांत होत आहे.

धर्माबाद येथील तहसीलदार दत्तात्रय शिंदे व उपविभागीय अधिकारी राजेंद्र शेळके यांचा तलाठी, मंडळ अधिकारी व कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर अंकुश नसल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना लहान-मोठ्या कामांसाठी कार्यालयात खेटे मारावे लागत आहेत. तसेच मालमत्तेची नोंद सातबाऱ्यावर करण्यासाठी मालमत्ताधारकांनी संबधित तलाठ्यांकडे प्रस्ताव दाखल करूनही अनेक महिने उलटले आहे. तरीसुद्धा संबंधित तलाठ्यांनी नोटीस काढण्यासाठी टाळाटाळ करून मालमत्ताधारकांची आर्थिक लूट करीत आहेत. मालमत्तेची नोंद सातबाऱ्यावर करण्यासाठी तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी संबधित मालमत्ताधारकांकडून १० ते १५ हजार घेतल्याशिवाय नोटीस काढत नसल्यामुळे सर्व मालमत्ताधारकांत संतापाची लाट उसळली आहे. तसेच धर्माबाद तालुक्यातील मुला-मुलींनी शिक्षणासाठी विविध जातीचे प्रमाणपत्र काढाण्यासाठी ऑनलाईन प्रस्ताव दाखल केले आहेत; परंतु तत्कालीन विभाग प्रमुखांनी संबधित पालक वर्गाकडून आर्थिक तडजोड केल्याशिवाय सदरील प्रकरणे उपविभागीय अधिकारी यांच्याकडे जाऊ देत नव्हते. त्यामुळे असंख्य पालक मुला-मुलींचे जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालयात खेटे मारीत असल्याचे चित्र दिसत आहे.

तसेच तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी संगनमत करून रत्नाळी व बाळापूर सज्यातील वनविभाग, देवस्थान, भोगवटदार क्रमांक दोनच्या जमिनीचे नियमबाह्य पद्धतीने संबधितांची नावे सातबाऱ्यावर घेतली आहेत. सदरील प्रकरणात तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी लाखो रूपयांचे चांगभले करून घेतले असल्याची चर्चा शहरातील जनतेत होत आहे. त्यामुळे सदरील प्ररकरणाची चौकशी केल्यास सत्य उजेडात येणार असल्याची चर्चा होत आहे. केंद्र सरकारने डॉ. हेडगेवर यांची जन्मभूमी असलेली तेलंगणा राज्यातील कंदकूर्ती ते नागपूर या कर्मभूमीपर्यत राज्य महामार्गाचे काम सुरू केले आहे. सदरील रस्त्याचे काम प्रगतीपथावर असल्यामुळे परिसरातील जमिनींच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. त्यामुळे त्या परिसरातील भोगवटदार क्रमांक दोन व देवस्थानच्या जमीन बळकावण्याच्या हालचाली काही भूमाफिया संबंधित तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांना हाताशी धरून करीत असल्याची चर्चा तालुक्यातील जनतेत होत आहे; परंतु उपविभागीय अधिकारी राजेंद्र खंदारे यांनी शुक्रवारी पदभार घेऊन तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसील व उपविभागीय अधिकारी कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांची बैठक घेतली आहे.

सदरील बैठकीत सर्वाची ओळख करून घेतली व कोणत्याही कामात पारदर्शकता ठेवूनच सर्वांनी कामे करावीत अन्यथा नियमानुसार कठोर कारवाई करण्याचे ठणकावून सांगितल्यामुळे भ्रष्ट तलाठी, मंडळ अधिकारी व कर्मचाऱ्यांत घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. उपविभागीय अधिकारी राजेंद्र खंदारे यांच्या पारदर्शक कारभारामुळे धर्माबाद उपविभागातील शेतकरी, मालमत्ताधारक, नागरिक व शिक्षण घेत असलेल्या मुला-मुलींची रखडलेली कामे मार्गी लागणार असल्याची चर्चा तालुक्यातील जनतेत होत आहे. तसेच शुक्रवारी उपविभागीय अधिकारी राजेंद्र खंदारे यांची भेट काही नागीरकांनी घेतली असून त्यांनी अनेक महिन्यांपासून विविध कामे रखडलेली असल्याचे सांगताच, खंदारे यांनी येत्या काही दिवसांत संबंधित प्रकरणातील कागदपत्रे बरोबर असतील तर काम नक्की होणार, कागदपत्रांत कमतरता असेल तर तुम्हाला लगेच कळविण्यात येणार व कोणत्याही कामांसाठी माझ्याकडे शिफारस आणण्याची गरज नसल्याचे खंदारे यांनी अनेकांना सांगितले आहे. त्यामुळे तहसील व उपविभागीय अधिकारी कार्यालयातील प्रलंबित प्रकरणे पारदर्शकपणे मार्गी लागतील, असा विश्वास संबंधितांमध्ये निर्माण झाला असल्याचे चित्र दिसत आहे.

नांदेडमध्ये झालेल्या दंगलीच्या पार्श्वभुमीवर आज राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालकांनी आढावा बैठक घेतली. परिस्थितीची माहिती जाणून घेतली.

नावात बदल

मी लिंबाजी बुचन्ना गुर्जलवार (Limbaji Bhuchenna Gurjalwar) रा. गोकुळनगर, रत्नाळी, ता.धर्माबाद, जि. नांदेड येथील असून असे जाहीर प्रगटनाद्वारे सांगतो की, माझ्या शैक्षणिक कागदपत्रावर माझ्या वडीलांच्या नावात स्पेलिंगमध्ये बुचन्ना (Buchenna) असे लिहिण्यात आले आहे आणि पॅनकार्ड व आधारकार्ड इतर कागदपत्रावर वडीलांच्या नावात स्पेलिंगमध्ये बुचन्ना (Buchenna) असे पडले आहे. सदरील माझे पूर्ण लिंबाजी बुचन्ना गुर्जलवार (Limbaji Bhuchanna Gurjalwar) व लिंबाजी बुचन्ना गुर्जलवार (Limbaji Bhuchenna Gurjalwar) हे एकच असून इतर कोणाचेही नाहीत करिता मला लिंबाजी बुचन्ना गुर्जलवार (Limbaji Bhuchenna Gurjalwar) असे गृहित धरावे. यास कोणही आक्षेप घेतल्यास मी जबाबदार राहीन करिता वडीलांच्या नावात स्पेलिंगमध्ये बदल असल्या बाबतचे जाहीर प्रगटन

मो :- ९६०४३४६३००

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

(निवडणूक शाखा)

जा.क्र. नांवाशमनपा/निवड/११८१/२१ दि. १६/११/२०२१

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

जाहीर सूचना

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका पोट निवडणूक - २०२१

अंतिम मतदार यादी प्रसिद्धी

ज्याअर्थी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १३ - अ च्या पोट निवडणुकीसाठी करीता राज्य निवडणूक आयोग यांचे पत्र क्रं. रानिआ/मनपा-२०२१/प्रक्र.१८/का-५, दि. ०९ नोव्हेंबर २०२१ नुसार मतदार यादी तयार करणे व प्रसिद्ध करणे बाबत कार्यक्रम निश्चित करून दिलेला आहे.

त्याअर्थी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. १३ मधील जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार ०१.११.२०२१ रोजी अस्तित्वात असलेल्या ८६ उत्तर नांदेड व ८७ दक्षिण नांदेड विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीवरून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रभाग क्र. १३-अ च्या पोट निवडणूकीसाठी तयार केलेली प्रारूप मतदार यादी जनतेच्या माहितीसाठी व कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी मनपाच्या क्षेत्रिय कार्यालय क्र. ०५ इतवारा येथे प्रसिद्ध करून दि. १२.११.२०२१ ते दि.१६.११.२०२१ पर्यंत सूचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या सुचना व हरकतींचा विचार करून, व प्रभागाच्या चतु:सिमेनूसार मतदार यादीची तपासणी करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७-अ नुसार मतदार यादी तयार करण्यात आलेली आहे. सदर अंतिम मतदार यादी नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत असून मतदार यादी नागरिकांना पाहण्यासाठी मनपाच्या क्षेत्रिय कार्यालय क्र. ०५ इतवारा, महाराजा रणजितसिंघजी मार्केट, जुना मोंढा नांदेड येथे तसेच महापालिकेच्या संकेतस्थळ ... यावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

दिनांक :- १७.११.२०२१
ठिकाण :- नांदेड

स्वाक्षरीत/ -
आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक राम चंडिदासराव शेवडीकर यांनी अक्षर कम्युनिकेशन्स, शहीद भगतसिंह रोड, रामकृष्ण टॉकिजमागे,नांदेड येथे छापून 'आनंदऋतू' ३-३-४४९/१ शहीद भगतसिंह रोड, रामकृष्ण टॉकिज मागे नांदेड ४३१६०१ येथे प्रकाशित केले.
● **संपादक : राम शेवडीकर** फोन : २३९५६०, ९४२२१७१८८५ फॅक्स (०२४६२) २३८५६० email:umarathwada@gmail.com, ● दैनिकात प्रकाशित झालेल्या लेखांमधील मते त्या त्या लेखकांची आहेत. संपादक अथवा प्रकाशन संस्था त्याच्याशी सहमत असतीलच असे नाही.
● © सर्व हक्क प्रकाशकाकडे सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत: पुन:प्रकाशनास वा पुन:प्रसारणास मनाई. RNI Reg.No.MAHMAR/15357/2005 रजि. जी-२/आरएनपी/ एनएनडी-४८७/२०१९-२०२१ ● epaper.umarathwada.com